## निवडक

### गोवा मल्लखांब संघ पुरुष, महिला संघांची आज निवड चाचणी

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. १३ : बिहारमध्ये २ मे ते ६ मे पर्यंत होणाऱ्या खेलो इंडिया यूथ गेम मल्लखांब स्पर्धेसाठी गोवा मल्लखांब असोसिएशन आणि गोवा खेल प्राधिकरण यांनी गोवा मल्लखांब संघ पुरुष आणि महिला संघ निवड चाचणी दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता स्वस्तिक विद्यालय प्रियोळ येथे घेण्यात येणार आहे. तरी गोव्यातील मल्लखांब खेळाडूंनी याची नोंद घेवून स्वस्तिक विद्यालय प्रियोळ येथे हजर राहावे, असे कळविण्यात आले आहे.

---

### सावई येथे १७ पासून टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. १३** : सावई येथील दीपक स्पोर्ट्स क्लबतर्फे आठवी अखिल गोवा वॉर्ड पातळीवर फ्लडलाईट टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १७ ,१८ व १९ एप्रिल रोजी वळवई येथील क्रोकोडायल पार्क मैदानावर रात्रीची खेळविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत प्रथम नावनोंदणी करणाऱ्या ३२ संघांना प्रवेश देण्यात येणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघाला ३००३०, उपविजेत्या संघास १५०१५ तर उपांत्य सामन्यात पराभूत झालेल्या संघांना ५००५ रुपयांची दोन बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. अधिक माहितीसाठी कमलाकांत (९१५८२१०८०६) किंवा चंदन (८७८८१५३५२६) यांच्याशी संपर्क साधावा असे आयोजकातर्फे कळविण्यात आले आहे.

---

### मेणकुरे येथील सरकारी माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १३** : डिचोली तालुक्यातील मेणकुरे ग्रामपंचायत क्षेत्रातील सरकारी माध्यमिक विद्यालय – मेणकुरे चा २०२४ –२५ सालच्या शालांत परीक्षेत दहावीचा निकाल १०० टक्के लागला . हे विद्यालय ग्रामीण भागात असून शिक्षक वर्ग अतिशय मेहनतीने विद्यादानाचे काम करीत आले आहेत. त्यामुळे चांगला निकाल लागत असतो. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सर्वेदा गावकर, शिक्षक गोपाळ सावंत, इतर शिक्षक व कर्मचारी यांचे पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष सुनिल नाईक व इतर सदस्यातर्फे उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या व उज्वल यशाबद्दल आनंद व्यक्त केला.

या विद्यालयातील एकूण १७ विद्यार्थी शालांत परीक्षेला बसले होते त्यात चार विद्यार्थी विशेष श्रेणीत, आठ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, पाच विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. यात आदित्य राज गुप्ता यांने ८२.५० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम , सानिया अरुण परब हिने ८१.८३ टक्के मिळवून द्वितीय, सिध्दांत तानाजी भटाळे याने ७८.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक तर दिव्या धाकटू गाड हिने ७७ टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक मिळविला.

---

### विद्याप्रसारक विद्यालय मोरजीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३** : मोरजी,पेडणे येथील विद्याप्रसारक समाज संचालित विद्याप्रसारक विद्यालयाने १०च्या निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली. विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. या वर्षी विद्यालयातून ३२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.सर्व विद्यार्थी पास झाले. यामध्ये ९ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी, १७ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी व ६ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी मिळाली. कुमारी गुंजन गोविंद शेटगावकर व वैभवी लक्ष्मण गडेकर या दोघीही विद्यार्थिनी ८५.१७ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आल्या. समीराबानू मुलिमनी ही विद्यार्थिनी ७९.५ टक्के गुण मिळवून दुसरी आली

तर भावेश म्हादळेकर हा ७८.६७ टक्के गुण मिळवून तृतीय आला. तसेच वंशिका शेटगावकर ७८.३३% , अनुष्का शेटगावकर ७६.१७ %, शौर्य सावंत ७५.१७ %, दिया शेटगावकर ७५.१७%, नितीशा शेटगावकर ७५% यांना विशेष श्रेणी मिळाली. गुंजन शेटगावकर ७४.३३%, देवांश च्यारी ७४ %, कुसुमांजली अज्ञानी ७३.५%, रिया शेटगावकर ७१.१७% , मनश्री शेटगावकर ७०.५ %, मेघना मोरजकर ७०.१७%, सान्वीं शेटगावकर ६९.६७ %, मयुरेश शेट्ये ६८.३३%, सार्थक परब ६६.६७%, अनिशा गावडे ६६.१७%, सकीना खान ६५.१७%, प्रमीत पोके ६३.६७%, ओंकार मोरजकर ६३.५%, पेरपेचूआ डिसुझा ६३.१७%, हर्षिता गोसावी ६२.८३% व उज्वला शेटगावकर ६०% यांना प्रथम श्रेणी मिळाली. तर सानिका शेटगावकर ५९%, रत्नदीप मोरजकर ५८%, टीना मोरर्जे ५७.६७%, संजू सैनी ५७.३३%, प्रथमेश शेटगावकर ५१% व गायत्री शेटगावकर ५०.५% यांना द्वितीय श्रेणी प्राप्त झाली. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल विद्याप्रसारक समाज संस्थेचे तसेच व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश शेटगावकर व इतर कार्यकारिणी सदस्य, मुख्याध्यापक दिलीप मेथर व इतर सर्व शिक्षक, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष प्रीती शेटगावकर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र चंद्रकांत शेटगावकर यांनी सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

---

### पार्से दुर्गा इंग्लिश स्कूलचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १३** : पार्से येथील श्री दुर्गा इंग्लिश स्कूलने २०२४ शालांत परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली.त्यांच्या यशाबद्दल पंचक्रोशी कौतुक व अभिनंदन केले जात आहे. गेल्या काही वर्षापासून या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागत असून, यंदाही उत्कृष्ठ निकालाची परंपरा जपली.ह्या विद्यालयाची रिया कोलकर ८५ टक्के गुण घेऊन विद्यालयात प्रथम आली, द्वितीय खतिजा खान ७८% टक्के तर विकेश निळोजी हा विद्यार्थी ७२ टक्के गुण मिळवून तिसरा आला.

या दर्जेदार निकालाबद्दल विद्यालयाचे चेअरमन श्री रामनाथ सावंत , व्यवस्थापक बाळकृष्ण बर्डे, मुख्याध्यापिका अनुपमा आरोलकर, पालक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्यामप्रसाद गवंडी या सर्वांनी या निकालावर समाधान व्यक्त केले आहे. विद्यालयातील उत्तीर्ण विद्यार्थी व अध्यापक वर्ग शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

---

### नवदुर्गा हायस्कूलचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १३** : गोवा शालान्त मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत आंबेगाळ पाळी येथील शारदा एज्युकेशनल सोसायटी संचलित श्री नवदुर्गा हायस्कूलने यंदाही आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत १०० टक्के निकालाची नोंद केली आहे.

सिद्धी गावडे हिने ९०.२ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला. कु .वृध्दी गावस हिने ८७.७ टक्के गुण मिळून विद्यालयात द्वितीय तर कु.गौरवी गावडे हिने ८२.२ टक्के गुण मिळून तृतीय क्रमांक पटकावला. यावर्षी विद्यालयातून एकूण २२ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते त्या पैकी विशेष श्रेणीत ५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १३ विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणीत ४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र गावस, व्यवस्थापक शंकर दळवी, सचिव रघुवीर वर्दे, तसेच मुख्याध्यापक सर्वेश कोटकर व पालक शिक्षक संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकवर्गाचे अभिनंदन केले.

# बंगळुरूचा राजस्थानवर शानदार विजय

## कोहलीची १००वी टी-२० फिफ्टी : सॉल्टच्या ६५, यशस्वीच्या ७५ धावा

**जयपूर, दि. १३ :**

आयपीएलच्या २८ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने राजस्थान रॉयल्सचा ९ विकेट्सने पराभव केला. बंगळुरूने जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. राजस्थानने ४ विकेट गमावल्यानंतर १७३ धावा केल्या. बंगळुरूने १८ व्या षटकात केवळ १ विकेट गमावून लक्ष्य गाठले.

आरसीबीकडून विराट कोहलीने त्याच्या टी-२० कारकिर्दीतील १०० वे अर्धशतक झळकावले, त्याने ६२ धावा केल्या. फिल सॉल्टने ३३ चेंडूत ६५ धावा केल्या. देवदत्त पडिक्कल ४० धावा करून नाबाद राहिला. राजस्थानकडून यशस्वी जैस्वालने ७५ धावांची खेळी केली.

१८ व्या आयपीएल हंगामात, आरसीबीने ६ सामन्यांमधील चौथा विजय नोंदवला. संघाचे चारही विजय घराबाहेर मिळाले. दोन्ही पराभव घरच्या मैदानावर झाले. दुसरीकडे, राजस्थानला ६ सामन्यांतील चौथा पराभव पत्करावा लागला. संघाने फक्त २ सामने जिंकले आहेत. देवदत्त पडिक्कलने १८ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर संदीप शर्माविरुद्ध चौकार मारला. यासह त्याने संघाला ९ विकेट्सनी विजय मिळवून दिला. पडिक्कल ४० धावा करून नाबाद राहिला.

१५ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर विराट कोहलीने वानिंदू हसरंगाविरुद्ध षटकार मारला. यासह त्याने टी-२० मध्ये १०० वे अर्धशतक पूर्ण केले. विराटने आयपीएलमध्ये ५० पेक्षा जास्त धावांची ६६ वी धावसंख्याही केली. या बाबतीत त्याने डेव्हिड वॉर्नरची बरोबरी केली. दोघांनीही आयपीएलमध्ये ६६ वेळा पन्नासपेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

फिल साल्टने आठव्या षटकात वानिंदू हसरंगाविरुद्ध चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने २८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. पुढच्याच षटकात षटकार मारण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. त्याला कुमार कार्तिकेयने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. सॉल्टने ६५ धावा केल्या.

१७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात चांगली झाली. पॉवरप्लेमध्ये संघाने न गमावता ६५ धावा केल्या. आरसीबीने ५० धावा पूर्ण केल्या आहेत. महीश तीक्षणाने टाकलेल्या पाचव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर विराट कोहलीने एक धाव घेतली आणि संघाची धावसंख्या ५० धावांच्या पुढे नेली. यावेळी फिल साल्ट देखील क्रीजवर उपस्थित होता. आरसीबीने पहिल्या ३ षटकांत ३० धावा केल्या आहेत. फिल साल्ट आणि विराट कोहली क्रीजवर आहेत. १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, बंगळुरूचा सलामीवीर फिल साल्टने पहिल्याच षटकात १० धावा केल्या. राजस्थानकडून पहिले षटक वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने टाकले.

सुयश शर्माच्या गोलंदाजीवर ध्रुव जुरेलला जीवदान मिळाले. १७ व्या षटकातील शेवटचा चेंडू सुयशने मधल्या स्टंपवर पूर्ण लांबीने टाकला.



ध्रुव जुरेल पुढे सरसावला आणि हवेत एक शॉट मारला, पण तो योग्य वेळी मारला नाही आणि चेंडू वर गेला. इथे कोहलीने लाँग-ऑफवर कॅच सोडला. चेंडू थेट त्याच्याकडे आला, पण तरीही तो तो पकडू शकला नाही. हे पाहून तो स्वतः रागावला आणि रागात चेंडू परत फेकला.

यशस्वी जैस्वाल ७५ धावा करून बाद झाला. राजस्थानच्या डावाच्या १६ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर जोश हेझलवूडने त्याला एलबीडब्ल्यू केले. १६ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर, यशस्वी जैस्वालने स्कूप शॉट खेळला आणि जोश हेझलवूडच्या चेंडूवर षटकार मारला. एका ओव्हरपिच चेंडूवर, जैस्वाल ऑफ साईडकडे थोडा सरकला, बॅटच्या मध्यभागी चेंडू मारला आणि उत्तम वेळेनुसार, जैस्वालने फाइन लेगवर षटकार मारला. १४ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर राजस्थानची दुसरी विकेट पडली. यश दयालच्या चेंडूवर विराट कोहलीने रियान परागला झेलबाद केले. पराग ३० धावा करून बाद झाला.

# रिलायन्स फाउंडेशनचा देमपोवर ५–० विजय

## मोहन बागानने चेन्नईयिनला ३-० ने हरवले : तिसऱ्या दिवशीची कामगिरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४** :रिलायन्स फाउंडेशन यंग चॅम्प्स (आरएफवायसी) संघाने ड्रीम स्पोर्ट्स चॅम्पियनशिप फुटबॉल २०२५ राष्ट्रीय अंतिम फेरीच्या तिसऱ्या दिवशी देमपो एससीवर प्रभावी विजय मिळवला. आरएफवायसी ने देमपोला ५-० ने पराभूत केले. कर्णधार शॉन फर्नांडिस याने उत्कृष्ट खेळी करत संघासाठी पाचपैकी चार गोल केले.

शॉन फर्नांडिस याने १२व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर १४व्या मिनिटाला आणखी एक गोल करत पहिल्या सत्रात संघाला २-० अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रातही त्याने आपली फॉर्म कायम ठेवत आणखी दोन गोल केले. त्याने ६५व्या मिनिटाला हॅट्रिक पूर्ण केली






आणि ६८व्या मिनिटाला आपला चौथा गोल केला. त्यानंतर बदली खेळाडू हर्षल मणिगंदन याने ७१व्या मिनिटाला आणखी एक गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

दुसऱ्या सामन्यात, मोहन बागान सुपर जायंट्स (एमबीएसजी)संघाने आपली विजयी लय कायम ठेवत चेन्नईयिन एफसीला ३-० ने पराभूत केले. आदित्य मोंडल आणि प्रेम हंसडाक यांच्या गोलमुळे एमबीएसजी ने पहिल्या सत्रातच २-० अशी आघाडी घेतली. आदित्यने २१व्या मिनिटाला तर प्रेमने २२व्या मिनिटाला गोल केला. शेवटच्या अतिरिक्त वेळेत थांगनगैसांग हाओकिप याने तिसरा गोल करत विजय निश्चित केला.

# ग्लेन फिलिप्स दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर

**गुजरात, दि. १३ :**



गुजरात टायटन्सचा ग्लेन फिलिप्स दुखापतीमुळे आयपीएल-२०२५ मधून बाहेर पडला आहे. ६ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याला पाठीला दुखापत झाली होती. यामुळे तो आगामी सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. पीटीआयच्या वृत्तानुसार, फिलिप्स न्यूझीलंडला परतला आहे. २०२५ च्या आयपीएल मेगा लिलावात गुजरातने फिलिप्सला २ कोटी रुपयांना खरेदी केले.

६ एप्रिल रोजी खेळल्या गेलेल्या सामन्यात, हैदराबादच्या डावाच्या सहाव्या षटकात ग्लेन फिलिप्सला दुखापत झाली. प्रसिद्ध कृष्णाच्या षटकात थ्रो टाकताना त्याला स्नायूंचा ताण आला. नंतर फिजिओने त्याला मैदानाबाहेर नेले.

फिलिप्सने आतापर्यंत एकूण ८ आयपीएल सामने खेळले आहेत. या काळात त्याने ६५ धावा केल्या आहेत आणि दोन विकेट घेतल्या आहेत. २०२३ च्या आयपीएल हंगामात त्याला प्लेइंग-११ मध्ये संधी मिळाली नाही.

आयपीएलच्या १८ व्या हंगामात, आज दिवसाच्या पहिल्या सामन्यात, लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) गुजरात टायटन्स (जीटी) विरुद्ध सामना करेल. हा सामना लखनौच्या एकाना स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार दुपारी ३:३० वाजता खेळला जाईल. दोन्ही संघांनी त्यांचे मागील सामने जिंकले आहेत आणि ते त्यांची लय कायम ठेवू इच्छितात. आयपीएल २०२५ च्या पॉइंट्स टेबलमध्ये गुजरात टायटन्स अव्वल स्थानावर आहे. ज्यांनी आतापर्यंत ५ सामने खेळले आहेत आणि ४ सामने जिंकले आहेत आणि १ सामना गमावला आहे. त्यांचा नेट रन रेट १.४१३ आहे.

# हैदराबादच्या ओपनरने मोडला राहुलचा विक्रम



**हैदराबाद, दि. १३ :**

आयपीएल-१८ च्या २७ व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावांचा पाठलाग केला. शनिवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात, संघाने पंजाब किंग्जविरुद्धचे २४६ धावांचे लक्ष्य केवळ १८.३ षटकांत पूर्ण केले. सलामीवीर अभिषेक शर्मा आयपीएलमध्ये भारतासाठी सर्वाधिक वैयक्तिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने १४१ धावांची खेळी खेळली.

राजीव गांधी स्टेडियमवर अनेक उत्तम क्षण आणि विक्रम साकारले गेले. स्टोइनिसने शमीला सलग ४ षटकार मारले. यशच्या नो बॉलवर अभिषेक झेलबाद झाला. त्याने आपले शतक ऑरेंज आर्मीला समर्पित केले. अभिषेकने १०६ मीटर लांब षटकार मारला.

पंजाबच्या डावाच्या १२ व्या षटकात, श्रेयस अय्यरचा षटकार वाचवण्याच्या प्रयत्नात अभिषेक शर्माचा पाय बाउंड्रीला लागला. झीशान अन्सारीच्या षटकातील शेवटच्या चेंडूवर श्रेयसने लाँग ऑफवर मोठा शॉट खेळला. येथे सीमारेषेवर उभ्या असलेल्या अभिषेक शर्माने उडी मारून चेंडू पकडण्याचा प्रयत्न केला पण त्याचा पाय सीमारेषेच्या दोरीला लागला.

१५ व्या षटकात पंजाबने चौथी विकेट गमावली. षटकाच्या पहिल्याच चेंडूवर हर्षल पटेलने शशांक सिंगला एलबीडब्ल्यू बाद केले. शशांक पुढे झाला आणि त्याने शॉट खेळला. चेंडू त्याच्या पॅडला लागला. हर्षलने अपील केले पण पंचांनी ते फेटाळले. कर्णधार पॅट कमिन्सने एक रिव्ह्यू घेतला ज्यामध्ये चेंडू स्टंपला आदळत असल्याचे दिसून आले. इथे पंचांना त्यांचा निर्णय बदलावा लागला, शशांक २ धावा काढून बाद झाला. २० व्या षटकात पंजाब किंग्जने २७ धावा केल्या. मार्कस स्टोइनिसने मोहम्मद शमीविरुद्ध शेवटच्या ४ चेंडूत ४ षटकार मारले.

चौथ्या षटकात एसआरएचचा सलामीवीर अभिषेक शर्मा नो बॉलवर झेलबाद झाला. यश ठाकूरने ओव्हरचा तिसरा चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर टाकला, अभिषेक झेलबाद झाला. अभिषेक पॅव्हेलियनमध्ये जाऊ लागला, पण तिसऱ्या पंचाने चेंडू नो बॉल घोषित केला. पुढच्याच चेंडूवर अभिषेकने हेलिकॉप्टर शॉट खेळत षटकार मारला.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत प्राविण्य प्राप्त क्रीडापटूंचा पेडणे येथे सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३** : खेळांमध्ये विशेष प्राविण्य मिळवण्यासाठी नियमित सराव, कठोर परिश्रम आणि एकाग्र चित्ताची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन मांद्रेचे आमदार आणि गोवा हाऊसिंग बोर्डचे चेअरमन जीत आरोलकर यांनी पेडणे येथे बोलताना केले. तालुक्यातील खेळाडूंच्या उत्कर्षासाठी आवश्यक सुविधा व सर्वतोपरी सहकार्य करायला आपण कटिबद्ध आहे, असे सांगताना त्यांनी शारीरिक शिक्षक संघाच्या कार्याची मुक्त कंठाने प्रशंसा केली. पेडणे तालुका शारीरिक शिक्षक संघाने श्री भगवती हायस्कूल पेडणे येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या पेडणे तालुक्यातील खेळाडूंच्या गुणगौरव सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे पदावरून बोलत होते.



पेडणे : विजेत्यासोबत आमदार जीत आरोलकर, आमदार प्रवीण आर्लेकर व इतर.

यावेळी व्यासपीठावर पेडणेचे आमदार व गोवा हस्तकला महामंडळाचे चेअरमन प्रवीण आर्लेकर, क्रीडा खात्याचे सहायक विकास अधिकारी अर्जुन गडेकर, तालुका क्रीडा व्यवस्थापक फ्रँन्की रॉड्रिग्ज, पेडणे तालुका शारीरिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सोमनाथ पार्सेकर, श्री भगवती हायस्कूल पेडणेचे मुख्याध्यापक राघोबा कांबळी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते २०२४-२५ या शालेय वर्षी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये योग, कराटे, फुटबॉल, शूटिंगबॉल, वुशू एथलेटिक्स वगैरे क्रिडाप्रकारात सहभागी तसे पदकप्राप्त एकूण बेचाळीस मुलांना सन्मानचिन्हे व प्रशस्तिपत्रे देवून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री भगवती हायस्कूल पेडणेच्या मुलींनी स्वागत गीत सादर केले. समारंभाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सोमनाथ पार्सेकर यांनी केले. सचिव तनोज परब यांनी सुत्रसंचालन केले. संघाचे सदस्य जेरोमिनो फर्नांडिस यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. तर एन्सगर फर्नांडिस व दक्षता फर्नांडिस यांनी गुणगौरव सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. किशोर किनळेकर, तिमराज मुगविर, नवल नारोजी, तुषार चोडणकर, विश्वास कासार यांनी पुष्पगुच्छ प्रदान केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पल्लवी लाड, बिंदिया कोटकर, पूनम तिळवे व मनिषा परब यांनी विशेष परिश्रम घेतले. खजिनदार देवानंद गावडे यांनी आभार मानले.



सर्वण : स्पर्धेचे उद्घाटन करताना कालिदास घाटवळ. बाजूला गोकुळदास सावंत व इतर.

# हॉलिबॉल स्पर्धेत गुरुनाथ स्पोर्ट्स क्लब विजेता

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १३** : सर्वण येथे आयोजित केलेल्या ३१व्या अखिल गोवा व्हॉलिबॉल स्पर्धेत उसगाव येथील गुरुनाथ स्पोर्ट्स क्लब रूमोड संघाने अजिंक्यपद पटकावले.

अंतिम सामन्यात तालीगाव बॉयस संघाला पराभुत केले.विजेत्या संघाला२५ हजार व करंडक देण्यात आला. उपविजेता संघाला १५ हजार व करंडक देण्यात आला. उपांत्य फेरीत पराभुत कुलमाया संघ(सर्वण) व वाठारी संघ(कारापुर) ठरले. मान्यवरांच्या हस्ते विजेता संघाला बक्षिसे देण्यात आली.

बक्षीस वितरण समारंभला माजी सरपंच व विद्यमान पंच तन्वी सावंत, उप सरपंच दिव्या नाईक, माजी सरपंच गोकुलदास सावंत, देवस्थान अध्यक्ष सीताराम सावंत, डॉ. प्रवीण सावंत उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन नेहरू युवा केंद्राचे उप संचालक कालिदास घाटवळ, क्लबचे अध्यक्ष डॉ. नवसू सावंत, विवेक सावंत, रायू सावंत, विनोद सावंत, विद्याधर सावंत, सीताराम सावंत उपस्थित होते. सूत्रसंचालन विश्राम सावंत तर आभार प्रदर्शन विनोद सावंत यांनी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 221 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .